# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १९/९/२००८ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१३) इतिवृत्त**

**शुक्रवार,** दिनांक **१९ सप्टेंबर २००८ रोजी** स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **"मलीक अंबर स्थायी समिती सभागृह"** येथे **दुपारी १२-०० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला उप आयुक्त(म.), नगर सचिव व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान (मामू)
२. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
३. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
४. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
५. श्री. वसंत नरवडे पाटील
६. सौ. अल्पा विकास जैन
७. श्री. संजय जोशी
८. श्रीमती जयश्री किवळेकर
९. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
१०. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
११. श्री. कचरू सोनवणे
१२. श्री. सिताराम सुरे
१३. श्री. नारायण कुचे

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्रीमती मोमीन सफिया | : गुंठेवारी बाबत सर्वप्रथम मला माहिती हवी आहे. |
| श्री.रविकांत गवळी | : ५० दिवस स्थायी समितीची बैठक का झाली नाही याचा खुलासा व्हावा. |
| श्री. संजय जोशी | : गुंठेवारी प्रमुखाचे नाव काय आहे. |
| सहा.आयुक्त-१ | : गुंठेवारी कक्ष प्रमुख श्री.खालेद सैफुद्दीन एक महिण्याच्या सुट्टीवर गेल्या असल्याने त्यांचा चार्ज श्री.एम.एम.खान यांच्याकडे देण्यात यावा म्हणून ADTP ने प्रपोज केले होते त्यानुसार श्री.एम.एम.खान यांचेकडे तात्पुरता चार्ज देण्यात आला. |
| श्री.संजय जोशी | : आदेश कुणी काढले? ADTP गेल्या दोन वर्षापासून सभागृहात नाही. चार्ज कुणाकडे देण्यात यावा हे ADTP ठरवत असतात का? गुंठेवारी कक्ष प्रमुख यांचे कर्तव्य होते की, त्यांनी स्थायी समितीस कळवावे. |
| सहा.आयुक्त-१ | : आदेश सहा.आयुक्त-१ यांचेकडून काढण्यात आले. ADTP हे विभाग प्रमुख असल्याने त्यांनी प्रपोज केल्यानुसार आदेश काढण्यात आले. |
| मा.सभापती | : गेल्या सहा बैठकांपासून स.सदस्या गुंठेवारी बाबत प्रश्न विचारत आहे परंतु प्रशासनाकडुन माहिती देण्यास दिरंगाई होत आहे. |
| श्री.वसंत नरवडे | : उपआयुक्त यांना श्री.एम.एम.खान यांचे आदेश काढल्याचे माहिती आहे काय? |
| उपआयुक्त (म) | : याबाबत माहिती मिळाली आहे. |
| श्री.संजय जोशी | : श्री.खालेद सैफुउद्दीन रूजु झालेले आहे काय? |
| सहा.आयुक्त-१ | : गुंठेवारी कक्ष प्रमुख श्री.खालेद सैफुउद्दीन यांनी रजा वाढविली आहे. |
| श्री.संजय जोशी | :प्रशासनावर आपले नियंत्रण नाही. प्रशासनातील अधिकारी बैठकीला हजर राहत नाही. याला जबाबदार कोण आहे. महाराष्ट्रातील इतिहासातील पहिलीच घटना आहे की विभागीय आयुक्तांकडे महानगरपालिकेचा चार्ज देण्यात आलेला आहे. |

श्री.अ.रशिद खान(मामु): काल स.सदस्य पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री यांची भेट घेवून महानगरपालिकेचा अतिरीक्त चार्ज त्यांच्याकडे देण्यात यावा म्हणून विनंती करण्यात आलेला आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : गेल्या दोन दिवस मंत्रीमंडळाची बैठक झाली त्यात महानगरपालिकेतील अधिकारी, सदस्य, महापौरांनी जे परिश्रम घेतले आहे, महाराष्ट्र शासनाने १०० कोटी रूपये दिले आहे.

श्री. रविकांत गवळी :विषयाला वेगळे वळण लागत आहे, गुंठेवारी बाबत खुलासा करण्यात यावा. स्थायी समितीमधे राष्ट्रवादी कॉंग्रेसची सत्ता असतांना राष्ट्रवादीच्या सदस्यांना गेल्या ०६ मिटींग मधे माहिती देण्यात आलेली नाही व त्यांचा प्रश्न सोडवण्यात आलेला नाही.

श्री.संजय जोशी : कक्ष प्रमुख हजर नाही त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा सादर करावा की, कक्ष प्रमुखांवर काय कारवाई करता येईल.

उपआयुक्त(म) :गुंठेवारी प्रमुख आजच्या स्थायी समितीच्या बैठकीस गैरहजर आहे याबाबत प्रशासनाला व स्थायी समितीला काहीही कळविण्यात आलेले नाही, त्यामुळे संबधीताची आजच्या एक दिवसाची विनावेतन करण्यात यावी. गुंठेवारी कक्ष प्रमुख यांना बोलावून आढावा घेण्यात येवून स.सदस्यांचा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल.

**विषय क्र. ७९ :**

दिनांक **१/०७/२००८** (का.प.क्र.८), **८/०७/२००८** (का.प.क्र.९), **१६/०७/२००८** (का.प.क्र.१०), **२४/०७/२००८** (का.प.क्र.११), **३०/०७/२००८** (का.प.क्र.१२),रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.संजय जोशी : विषय क्र.७९ स्थगित ठेवावा.

मा. सभापती : विषय क्र.७९ सोमवारी (दि.२२/९/२००८) घेण्यात येईल.

श्री.संजय जोशी : दिनांक १/७/२००८ रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये ठराव क्र.५४ अन्वये शहागंज भाजी मंडईतील मनपाकडे नियमित भाडे भरणा केलेले ७ स्टॉल धारकांना पर्यायी जागा देण्यात आली. याच ठिकाणचे दुकान क्र.११४ चे गाळेधारक अ. करीम गुलाम यांचे दुकानाचे मार्च २००८ पर्यंतचे भाडे भरणा केलेले आहे. अ.करीम गुलाम यांचे निधन झालेले असल्याने, त्यांचे पत्नीचे विनंतीनुसार त्यांचे दीर श्री.मोहम्मद इब्राहीम मो.युसुफ मेमन यांना दुकान क्र. ११४ ऐवजी पर्यायी दुकानासाठी जागा देण्यात यावी.

मा. सभापती : श्री.मोहम्मद इब्राहीम मो.युसुफ मेमन यांनी दुकान क्र.११४ चे भाडे २००८ पर्यंत नियमित भरणा केलेले असल्याने त्यांना पर्यायी दुकानासाठी पर्यायी जागा देण्यात यावी. या दुरूस्तीसह स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक १/७/२००८ रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये पारीत झालेल्या ठराव क्र. ५४ मध्ये श्री.मोहम्मद इब्राहीम मो.युसुफ मेमन यांनी दुकान क्र. ११४ चे भाडे २००८ पर्यंत भरणा केलेले असल्याने त्यांना पर्यायी जागा देण्यात यावी अशी दुरूस्ती करण्यास मंजुरी देण्यात येते.

या व इतर दुरूस्तीसह **१/०७/२००८, ८/०७/२००८, १६/०७/२००८, २४/०७/२००८** व **३०/०७/२००८**रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ८० :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिके अंतर्गत सर्व विभागांकरीता सन २००८-०९ या वर्षासाठी लागणाऱ्या लेखन साहित्य व संगणक साहित्य पुरवठा करण्यास्तव मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार दैनिक सकाळ, दैनिक सामना, दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि.२७.५.२००८ ते दि.७.६.२००८ या कालावधीत लेखन साहित्य करिता एकुण ०९ निविदा विक्री झाल्या व दि.१०.६.२००८ रोजी ०६ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी आवश्यक कागदपत्रांची/साहित्याच्या नमुन्यांची पुर्तता न केल्यामुळे मे.क्रिश इंटरनॅशनल व मे.पेपर फिल्ड यांची निविदा स्विकारण्यात आली नाही. पुढे दर्शविल्याप्रमाणे पुरवठा धारकांच्या नावासमोर त्या त्या निविदा धारकाचे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे आयटम नमुद केलेआहेत.

१. न्यु भारत स्टोअर्स - ४० आयटम
२. ओ के ट्रेडर्स - २२ आयटम
३. अभय ट्रेडर्स - १७ आयटम
४. विजय जनरल स्टोअर्स - ०५ आयटम

एकुण ८७ आयटम पैकी ०५ आयटमचे दर ०२ निविदा धरकांचे तर एका आयटमचे दर ०३ निविदा धारकांचे समान आहेत. त्यांना विभागुन काम देण्यात येईल. प्राप्त कमी दरास व त्यानुसार येणाऱ्या खर्चास मा.आयुक्त यांनी मान्यतेस्तव शिफारस केली आहे. लेखन साहित्य खरेदीकरीता एकुण रू.६,५०,०००/- एवढा खर्च अपेक्षीत आहे.

तसेच संगणक साहित्य खरेदी करीता एकुण ०७ निविदा विक्री झाल्या व दि.१०.६.२००८ रोजी ०३ निविदा प्राप्त झाल्या. पुढे दर्शविल्याप्रमाणे पुरवठा धारकांच्या नावासमोर त्या त्या निविदाधारकाचे तुलनात्मकदृश्ट्या प्राप्त कमी दराचे आयटम नमुद कले आहेत.

१. न्यु भारत स्टोअर्स - २४ आयटम
२. ओ.के. ट्रेडर्स - १० आयटम
३. विजय जनरल स्टोअर्स - ०८ आयटम

एकुण ४३ आयटम पैकी ०२ आयटमचे दर ०२ निविदाधारकांचे समान आहेत. त्यांना विभागुन काम देण्यात येईल. प्राप्त कमी दरास व त्यानुसार येणाऱ्या खर्चास मा.आयुक्त यांनी मान्यतेस्तव शिफारस केली आहे. संगणक साहित्य खरेदी करीता एकुण रू.८,८०,०००/- एवढा खर्च अपेक्षीत आहे.

करीता लेखन साहित्याकरीता रू.६,५०,०००/- व संगणक साहित्याकरीता रू.८,८०,०००/- असा एकूण १५,३०,०००/- एवढा खर्च अपेक्षीत आहे. करीता निविदा दर स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिके अंतर्गत सर्व विभागांकरीता सन २००८-०९ या वर्षासाठी लागणाऱ्या लेखन साहित्य पुरवठा करण्यास्तव तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे निविदाधारकांचे नांवासमोर दर्शविलेल्या आयटमचे दरास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. न्यु भारत स्टोअर्स - ४० आयटम
२. ओ के ट्रेडर्स - २२ आयटम
३. अभय ट्रेडर्स - १७ आयटम
४. विजय जनरल स्टोअर्स - ०५ आयटम

तसेच संगणक साहित्य पुरवठा करण्यास्तव तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे निविदाधारकांचे नांवासमोर दर्शविलेल्या आयटमचे दरास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. न्यु भारत स्टोअर्स - २४ आयटम
२. ओ.के. ट्रेडर्स - १० आयटम
३. विजय जनरल स्टोअर्स - ०८ आयटम

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ८१ :</u>**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिके अंतर्गत सर्व विभाग आणि जकात विभागाकरीता सन २००८-०९ या वर्षासाठी लागणाऱ्या छपाई साहित्य व जकात छपाई साहित्य पुरवठा करण्यास्तव मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार दैनिक सकाळ, दैनिक सामना, दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि.२७.५.२००८ ते दि.७.६.२००८ या कालावधीत छपाई साहित्य करिता एकुण ०६ निविदा विक्री झाल्या व दि.१०.६.२००८ रोजी ०३ निविदा प्राप्त झाल्या. पुढे दर्शविल्याप्रमाणे पुरवठा धारकांच्या नावासमोर त्या त्या निविदा धारकाचे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे आयटम नमुद केलेआहेत.

१. अभय ट्रेडर्स - ६२ आयटम
२. लिबर्टी प्रिन्टर्स - ५८ आयटम
३. जयभारती एक्सरसाईज बुक मॅन्यु. कंपनी - ०४ आयटम

एकुण १२४ आयटम पैकी ०३ आयटमचे दर ०२ निविदा धरकांचे समान आहेत. त्यांना विभागुन काम देण्यात येईल. प्राप्त कमी दरास व त्यानुसार येणाऱ्या खर्चास मा.आयुक्त यांनी मान्यतेस्तव शिफारस केली आहे. छपाई साहित्य खरेदीकरीता एकुण रू.१२,३५,०००/- एवढा खर्च अपेक्षीत आहे.

तसेच जकात छपाई साहित्य खरेदी करीता एकुण ०४ निविदा विक्री झाल्या व दि.१०.६.२००८ रोजी ०३ निविदा प्राप्त झाल्या. पुढे दर्शविल्याप्रमाणे पुरवठा धारकांच्या नावासमोर त्या त्या निविदाधारकाचे तुलनात्मकदृश्ट्या प्राप्त कमी दराचे आयटम नमुद कले आहेत.

१. अभय ट्रेडर्स - २० आयटम
२. लिबर्टी प्रिन्टर्स - ०२ आयटम

प्राप्त कमी दरास व त्यानुसार येणाऱ्या खर्चास मा.आयुक्त यांनी मान्यतेस्तव शिफारस केली आहे. जकात छपाई साहित्य खरेदी करीता एकुण रू.७,४५,०००/- एवढा खर्च अपेक्षीत आहे. सदरील साहित्य हे जकात विभागाचे मागणी व गरजेनुसार खरेदी करण्यात येईल.

करीता छपाई साहित्याकरीता रू.१२,३५,०००/- व जकात छपाई साहित्याकरीता रू.७,४५,०००/- असा एकूण १९,८०,०००/- एवढा खर्च अपेक्षीत आहे. करीता निविदा दर स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिके अंतर्गत सर्व विभाग आणि जकात विभागाकरीता सन २००८-०९ या वर्षासाठी लागणाऱ्या छपाई साहित्य पुरवठा करण्यास्तव तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे निविदाधारकांचे नांवासमोर दर्शविलेल्या आयटमचे दरास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. अभय ट्रेडर्स - ६२ आयटम
२. लिबर्टी प्रिन्टर्स - ५८ आयटम
३. जयभारती एक्सरसाईज बुक मॅन्यु. कंपनी - ०४ आयटम

तसेच जकात छपाई साहित्य पुरवठा करण्यास्तव तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे निविदाधारकांचे नांवासमोर दर्शविलेल्या आयटमचे दरास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. अभय ट्रेडर्स - २० आयटम
२. लिबर्टी प्रिन्टर्स - ०२ आयटम

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिके अंतर्गत वॉर्ड कार्यालये, मलेरिया विभाग व इतर सर्व विभागाकरीता सन २००८-०९ या वर्षासाठी लागणाऱ्या स्वच्छता साहित्य व सफाई कर्मचारी स्वच्छता साहित्य पुरवठा करण्यास्तव मा.आयुक्त यांच्या मान्यतेनुसार दैनिक सकाळ, दैनिक सामना, दैनिक लोकमत या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि.२७.५.२००८ ते दि.७.६.२००८ या कालावधीत स्वच्छता साहित्या करिता एकुण ०७ निविदा विक्री झाल्या व दि.१०.६.२००८ रोजी ०४ निविदा प्राप्त झाल्या. पुढे दर्शविल्याप्रमाणे पुरवठा धारकांच्या नावासमोर त्या त्या निविदा धारकाचे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे आयटम नमुद केलेआहेत.

१. यश ट्रेडींग कंपनी - ६२ आयटम
२. न्यु भारत स्टोअर्स - ५८ आयटम
३. रोशन सेल्स कॉर्पोरेशन - ०४ आयटम
४. अभय ट्रेडर्स - ०२ आयटम

एकुण ५४ आयटम पैकी ०३ आयटमचे दर ०२ निविदा धरकांचे समान आहेत. त्यांना विभागुन काम देण्यात येईल. प्राप्त कमी दरास व त्यानुसार येणाऱ्या खर्चास मा.आयुक्त यांनी मान्यतेस्तव शिफारस केली आहे. स्वच्छता साहित्य खरेदीकरीता एकुण रू.१२.०० लक्ष एवढा खर्च अपेक्षीत आहे.

तसेच कर्मचारी स्वच्छता साहित्य खरेदी करीता एकुण ०९ निविदा विक्री झाल्या व दि.१०.६.२००८ रोजी ०५ निविदा प्राप्त झाल्या. पैकी क्रिश इंटरनॅशनल यांनी निविदे सोबत साहित्याचे नमुने न दिल्यामुळे त्यांची निविदा स्विकारण्यात आली नाही. पुढे दर्शविल्याप्रमाणे पुरवठा धारकांच्या नावासमोर त्या त्या निविदाधारकाचे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे आयटम नमुद कले आहेत.

१. न्यु भारत स्टोअर्स - ०३आयटम

एकुण तीनही आयटम करीता मे.न्यु भारत स्टोअर्स यांचे दर इतरांपेक्षा तुलनात्मकदृष्ट्या कमी आहेत. प्राप्त कमी दरास व त्यानुसार येणाऱ्या खर्चास मा.आयुक्त यांनी मान्यतेस्तव शिफारस केली आहे. कर्मचारी स्वच्छता साहित्य खरेदी करीता एकुण रू.५,०९,८५०/- एवढा खर्च अपेक्षीत आहे. सदरील साहित्य हे जकात विभागाचे मागणी व गरजेनुसार खरेदी करण्यात येईल.

करीता स्वच्छता साहित्याकरीता रू.१२.०० लक्ष व कर्मचारी स्वच्छता साहित्याकरीता रू.५,०९,८५०/- असा एकूण १७,०९,८५०/- एवढा खर्च अपेक्षीत आहे. करीता निविदा दर स्विकृतीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिके अंतर्गत वॉर्ड कार्यालये, मलेरिया विभाग व इतर सर्व विभागाकरीता सन २००८-०९ या वर्षासाठी लागणाऱ्या स्वच्छता साहित्य पुरवठा करण्यास्तव तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे निविदाधारकांचे नांवासमोर दर्शविलेल्या आयटमचे दरास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. यश ट्रेडींग कंपनी - ६२ आयटम
२. न्यु भारत स्टोअर्स - ५८ आयटम

३. रोशन सेल्स कॉर्पोरेशन - ०४ आयटम

४. अभय ट्रेडर्स - ०२ आयटम

तसेच कर्मचारी स्वच्छता साहित्य खरेदी करीता पुरवठा करण्यास्तव तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दराचे निविदाधारकांचे नांवासमोर दर्शविलेल्या आयटमचे दरास व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१. न्यु भारत स्टोअर्स - ०३आयटम

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.२१ मिसरवाडी नारेगांव अंतर्गत खडी रस्ता बांधणी करणेच्या कामाचे सा.बां.विभागाच्या सन २००५-०६ च्या दरसूची नुसार रक्कम रूपये ११,८९,४८३/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची दि.२०.१२.२००७ अन्वये मंजुरी प्राप्त आहे. सदरील काम नागरी दलित वस्ती सुधार योजने मधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एकुण चार निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

१. मे. अरबाज कन्स्ट्रक्शन **२०.०१**% कमी दराने

२. श्री शेख सलीम मोहीउद्यीन **११.८९**% कमी दराने

३. श्री. एम. ए. सईद **०७.१**% कमी दराने

४. श्री. सुनिल शामराव दांडगे **०९.९९**% जास्त दराने

वरील प्रमाणे प्राप्त निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.०१% कमी दराची मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांनी निविदा दाखल केली आहे. सदर निविदा सर्वात कमी दराची मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त आहे.

तरी सदरील कामासाठी मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.०१% कमी दराने प्राप्त झालेले निविदा दर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.२१ मिसरवाडी नारेगांव अंतर्गत खडी रस्ता बांधणी करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०.०१% की दराची मे.अरबाज कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आह`की, प्रभाग क्र.७ भावसिंगपुरा अंतर्गत साठेनगर, नवयुग कॉलनी, प्रभातनगर (गीतानगर, पंडीतनगर) येथील अरूंद गल्ल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे बाबतच्या कामाचे सा.बां. विभागाच्या सन २००६-०७ च्या दरसूचीन नुसार रक्कम रू.१४,३६,९१८/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची दि.२०.१२.२००७ अन्वये मंजुरी प्राप्त आहे. सदरील काम नागरी दलित वस्ती सुधार योजने मधुन प्रस्तावित आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता, एक निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा उघडण्यात आली असता त्यात खालील प्रमाणे दर भरून प्राप्त झाले.

१. श्री. एम. ए. सईद - ७.८६% कमी दराने

वरील प्रमाणे प्राप्त निविदा सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.८६% कमी दराची श्री.एम.ए.सईद यांनी निविदा दाखल केली आहे. तरी सदरील कामासाठी श्री.एम.ए. सईद यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.८६% कमी दराने प्राप्त झालेले निविदा दर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.७ भावसिंगपुरा अंतर्गत साठेनगर, नवयुग कॉलनी, प्रभातनगर (गीतानगर, पंडीतनगर) येथील अरूंद गल्ल्यात पेव्हर ब्लॉक बसविणे बाबतच्या कामासाठी प्राप्त झालेली श्री. एम. ए. सईद यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.८६% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५ :**

औरंगाबाद महानगरपालिकेने कैलासनगर येथील स्मशानभूमीमध्ये विद्युत दाहिनी दिनांक १६.४.१९९७ रोजी सुरू केली. प्रत्यक्षात २.१०.२००५ पासून अंत्यसंस्कारासाठी विद्युत दाहिनीचा प्रभावीपणे वापर सुरू झाला आहे. तथापी मध्यंतरीच्या काळात विद्युत दाहिनीतील शवदहनामुळे आसपासच्या परिसरात दुर्गंधी पसरत असल्याच्या तक्रारी नागरिक/समाजसेवी संस्थांकडून प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे विद्युत दाहिनी बंद ठेवून, प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने शवदाहिनीची तज्ञांमार्फत तपासणी केली असता, दुरूस्तीसाठी रूपये ७.५० लक्ष खर्च अपेक्षित असल्याचे दिसून आले.

विद्युत दाहिनीचा वापर करतांना विद्युत दाहिनी २४ तास सुरू ठेवावी लागते. त्यामुळे विजेचे बील मोठ्या प्रमाणात येते. सद्य:स्थितीत विद्युत दाहिनीचा वापर केला असता, विज बिलापोटी साधारणत: दरमहा रूपये ७५,०००/- म्हणजेच वार्षिक रूपये ९,००,०००/- खर्च येतो. तसेच विद्युत दाहिनी चालविण्यासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचे वेतन, विद्युत दाहिनीच्या देखभाल दुरूस्तीचा वार्षिक खर्च इत्यादी विचारात घेता खालील प्रमाणे खर्च येतो.

| | | |
|---|---|---|
| १. | विद्युत शवदाहिनीच्या विज बिलापोटी साधारपणपणे दरमहा खर्च रूपये ७५,०००/- येतो. याप्रमाणे दहा वर्षाचा खर्च (यात वीजेची दरवाढ धरलेली नाही) | ९०,००,०००/- |
| २. | विद्युत शव दाहिनी चालविण्यासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन रूपये ८०००/- प्रमाणे दहा वर्षाचे वेतन. (यात वेतनवाढ धरलेली नाही.) | ९,६०,०००/- |
| ३. | वार्षिक देखभाल दुरूस्ती (स्थापत्य+विद्युत) साधारण रूपये एक लक्ष प्रमाणे दहा वर्षाचे | १०,००,०००/- |
| | **एकुण -** | **१,०९,६०,०००/-** |
| | **म्हणजेच ढोबळपणे दहा वर्षासाठीचा अंदाजे खर्च -** | **१,१०,००,०००** |
| | **शिवाय उक्त नमूद केल्याप्रमाणे सध्या विद्युत दाहिनी दुरूस्तीचा खर्च -** | **७,५०,०००/-** |
| | **एकुण :-** | **१,१७,५०,०००/-** |

तरी मान्यता प्राप्त संस्थेकडून विद्युत दाहिनीचे एल.पी.जी. गॅस शवदाहिनी मध्ये रूपांतर करणे, दहा वर्षे शवदाहिनीची देखभाल करणे, शवदाहिनी चालविणे इत्यादी कामांसाठी स्पर्धात्मक दर मागविणेच्या मंजुरीसाठी दि.१७.५.२००८ रोजी संपनन झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यास विषय क्र.२३१ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार जा.क्र.मनपा/ई-निविदा/१७३/२००८ दि.२.६.२००८ अन्वये निविदा मागविण्यात आली असता मे.चिरंतन उद्योग, ठाणे यांची निविदा प्राप्त झाली. त्यांनी नमूद केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | कामाचा प्रकार | प्राप्त दर रूपये |
|---|---|---|---|
| १. | मे. चिरंतन उद्योग, ठाणे | विद्युत दाहिनीचे गॅस दाहिनीमध्ये रूपांतर करणे. | २२,७४,०००/- |
| २. | | दहा वर्षे गॅस दाहिनी चालविणे, देखभाल दुरूस्ती करणे इत्यादी. | २२,५००/- प्रति महिना (५% वार्षीक दरवाढ) |

अस्तित्वातील विद्युत शव दाहिनीचे गॅस दाहिनीमध्ये रूपांतर करण्यासाठी रू.२२,७४,०००/- तर शव दाहिनी चालविणे, देखभाल दुरूस्ती करणे यासाठी मासिक रू.२२,५००/- (५% वार्षिक दरवाढ) प्रमाणे **मे.चिरंतन उद्योग, ठाणे** यांचे दर प्राप्त झाले आहेत. यामध्ये गॅस पुरवठा, दाहिनीच्या इमारती करीता विद्युत व्यवस्था, पाणी पुरवठा, जलनि:सारण जोडणी इत्यादी बाबी महापालिकेस पुरविणे आहे. या बाबी विचारात घेता विद्युत दाहिनीचे एल.पी.जी. गॅस शवदाहिनी मध्ये रूपांतर करणे, दहा वर्षे शव दाहिनीची देखभाल करणे, शव दाहिनी चालविणे, गॅस पुरवठा, कर्मचारी इत्यादीसाठी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | विद्युत दाहिनीचे गॅस दाहिनीमध्ये रूपांतर करणेसाठी मे.चिरंतन उद्योग, ठाणे यांना द्यावयाची रक्कम | २२,७४,०००/- |
| २. | दहा वर्षासाठी विद्युत बिलाचा खर्च (प्रती माह रूपये ५०००/- प्रमाणे) | ६,००,०००/- |
| ३. | दहा वर्षासाठी महानगरपालिकेने गॅस साठी करावयाचा खर्च | ३०,००,०००/- |
| ४. | शवदाहिनीची देखभाल करणे, शवदाहिनी चालविणे यासाठी मे.चिरंतन उद्योग यांना प्रतिमाह रू.२२,५००/- प्रमाणे (दरवर्षी ५% वाढ नुसार) दहा वर्षासाठी द्यावयाची रक्कम | ३३,९६,०३२/- |
| | **दहा वर्षासाठीचा अंदाजे खर्च -** | **९२,७०,०३२/-** |

प्रतिमाह २५ शव दहन होतील असे गृहीत धरून त्यानुसार होणारा खर्च व मे.चिरंतन उद्योग यांना पुढील दहा वर्षासाठी द्यावयाचा खर्च काढला असता गॅस शवदाहिनीचा वापर विद्युत दाहिनीपेक्षा कमी खर्चाचा होणारा असून, आर्थिकदृष्ट्या परवडणारा आहे. तसेच देखभाल दुरूस्ती बाबत येणाऱ्या तक्रारींना वाव मिळणार नाही.

तरी मे.चिरंतन उद्योग, ठाणे यांनी विद्युत शव दाहिनीचे गॅस दाहिनीमध्ये रूपांतर करण्यासाठी रू.२२,७४,०००/- तर शव दाहिनी चालविणे, देखभाल दुरूस्ती करणे यासाठी मासिक रू.२२,५००/-(५% वार्षिक दरवाढ) प्रमाणे दिलेल्या दरास मान्यता होणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संजय जोशी : विषय क्रमांक ८५ बाबत काही मुद्दे मांडावयाचे आहे. विद्युत दाहिनीचा वापर सद्य:स्थितीत वापर केला असता, विज बिलापोटी सधारणत: दरमहा रूपये ७५,०००/- म्हणजेच वार्षिक रूपये ९,००,०००/- खर्च येतो. विद्युत दाहीनी केंव्हा सुरू करतो. विद्युत दाहिनीत बॉडी येते

तेव्हाच चालविण्यात येते, सर्वसाधारण सभेत ठरवण्यात आले होते की, ज्या कुणाला विद्युत दाहिनीमधे बॉडी दहन करावयाची असेल त्यांनी महानगरपालिकेत स्मशान परवानाच्या वेळी सांगावे, मनपाचा माणुस जावून विद्युत दाहिनी सुरू करेल व अत्यंविधी करण्यात येईल. दुसरे म्हणजे विदयुत शव दाहिनी चालविण्यासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन रूपये ८०००/- असा आहे तर कोण कर्मचारी आहे. जेंव्हा जेंवहा गेलो तेंवहा स्मशानजोगीच अंत्यविधी व विद्युत दाहिनी चालू करतात.

श्री.वसंत नरवडे : सदरची एजन्सी फिक्स केली आहे का?

श्री.वसंत नरवडे पा. : मीटरभाडे किती आहे. रूपांतर करून दाखवले. सर्व कार्यवाहीचे ठरले असेल तर सभेपुढे का आणले.

कार्य.अभि.(ड्रेविइवउ) : हा जो प्रस्ताव आलेला आहे, विद्युत दाहिनीतुन घान वास येत होता सध्या विदयुत वाहिनी बंद आहे. ७.७५ लाख खर्च गेल्या २ वर्ष विद्युत दाहिनी चांगल्या प्रकारे सुरू होती, रेकॉर्ड आहे. स.सदस्यांचे म्हणण्यानुसार डेड बॉडी आल्यानंतर दाहिनी सुरू करावयाची आणि त्या नंतर रिक्वायर टेंम्परेचर आल्यानंतर डेड बॉडी जाळायची आपण त्या पध्दतीने करत नाही. आपल्याला कंन्टीयुन्यू दाहिनी चालू ठेवावी लागणार आहे. डेड बॉडी आल्यानंतर दाहिनी सुरू करणे टेक्निकली शक्य नाही.

श्री.वसंत नरवडे :विद्युत दाहिनीचा वापर मी माझ्या वार्डातील एका नागरीकाच्या अंत्यविधीसाठी गेलो असता तो तासभर आदि चालू ठेवावे लागते. दिवसभर चालू राहत नाही. एजन्सी फिक्स करण्यात आलेली आहे काय?

कार्य.अभि.(ड्रेविइवउ) : एक तासात होऊ शकत नाही. निश्चित टेंप्रेचर आल्यावर बंद करतो.

श्री.वसंत नरवडे पा. : १००% मनपाने खर्च केला पाहिजे. एजन्सी कशी फिक्स केली. हा खर्च योग्य नाही.

श्री.संजय जोशी :सदरचा ठराव मंजूर करणे गरजेचे आहे कारण कैलासनगर येथील आजूबाजूच्या नागरीकांना दुर्गंधी प्रचंड सामाना करवा लागत आहे. अत्यंविधीची जबाबदारी बऱ्याच महानगरपालिकांनी स्वत:हून उचललेली आहे. जळगाव नगरपालिकेत अत्यंविधीची जबाबदारी त्यांनी घेतली आहे.

श्री.वसंत नरवडे : १ कोटी १७ लाख महानगरपालिका खर्च करतेय आणि तिथं एकाही व्यक्तीला त्याचा फायदा मिळत नाही. १ वर्षाला १ कोटी खर्च करतो. निविदा का मागविली नाही.

श्री.रविकांत गवळी : हा विषय मंजूर करणे गरजेचे आहे. नागरीकांना दुर्गंधीमुळे त्रास होत आहे. गॅस दाहिनीमध्ये रूपांतर करणेचा जो प्रस्ताव आहे तो मंजूर करण्यात यावा. ८ ते १० तास लोड शेडिंग असते तसेच विद्युत दाहिनीपेक्षा गॅस दाहिनी कशी उपयुक्त आहे हे सांगण्यात आलेले आहे.

श्री.वसंत नरवडे : आपण जो खर्च विद्युत दाहिनीतून गॅस दाहिनीमधे रूपांतर करणार आहे. देखभाल करणेसाठी २२५००/- प्रमाणे दरवर्षी ५ टक्के वाढ नुसार दहा वर्षासाठी. दहाव्या वर्षात किती टक्क्यापर्यंत जाणार याचा अभ्यास करणे गरजेचे आहे. नागरीकांच्या मानसिकतेचा अभ्यास केला पाहिजे. जुण्या पध्दतीने शव दहन होत असतांना दुर्गंधी येत असेल तर काय व्यवस्था करता येईल याचा अभ्यास करावा. गॅसपुरवठा, विद्युत पुरवठा, पाणीपुरवठा या सर्व बाबींचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

श्री.संजय जोशी : सदरचा प्रस्ताव ५ ते ६ महिण्यापूर्वीचा आहे.

अति.कार्य.अभि. : सर्वसाधारण सभेने मंजूर केले आहे त्यानुसार प्रस्ताव ठेवण्यात आला आहे.

मा.सभापती : सदर विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. विषय क्रंमाक ८५ मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे कैलासनगर येथील स्मशानभूमीमध्ये विद्युत दाहिनीतील शवदहनामुळे आसपासच्या परिसरात दुर्गंधी पसरत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यामुळे अस्तित्वातील विद्युत शव दाहिनीचे गॅस दाहिनीमध्ये रूपांतर करण्यासाठी रू.२२,७४,०००/- तर शव दाहिनी चालविणे, देखभाल दुरूस्ती करणे यासाठी मासिक रू.२२,५००/- (५% वार्षिक दरवाढ) प्रमाणे **मे.चिरंतन उद्योग, ठाणे** यांचे प्राप्त झालेल्या दरानुसार दहा वर्षे शव दाहिनीची देखभाल करणे, शव दाहिनी चालविणे, गॅस पुरवठा, कर्मचारी इत्यादीसाठी लागणारा खर्च, मे.चिरंतन उद्योग, ठाणे यांनी विद्युत शव दाहिनीचे गॅस दाहिनीमध्ये रूपांतर करण्यासाठी रू.२२,७४,०००/- तर शव दाहिनी चालविणे, देखभाल दुरूस्ती करणे यासाठी मासिक रू.२२,५००/-(५% वार्षिक दरवाढ) प्रमाणे दिलेल्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००३ या वर्षात विभाग क्र. ७ मध्ये रू.१३,७४,२७५/- चा झालेल्या आर्थिक गैरव्यवहार/अपहार, कार्यालयीन दस्तऐवजामध्ये खाडाखोड करणे, अभिलेखे गहाळ करणे प्रकरणी कार्यालयीन आदेश क्र.मनपा/आस्था-१/२००३/१६०४, दि.९/१२/२००३ अन्वये श्री.संजय किसनराव करपे व श्री.नायबराव भिवसन जंजाळ(कनिष्ठ लिपिक) तत्कालीन रोखपाल हे जबाबदार असल्याचे दिसून आलयाने दोघांनाही निलंबीत करण्यात आले होते. तसेच संबंधीताविरूध्द पोलीस स्टेशन, सिडको येथे दि.२८/१/२००४ रोजी गुन्हा रजि.नं.३५/०४ भा.दं.वि. ४०९, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

कार्यालयीन ज्ञापन क्र. मनपा/आस्था-१/२००४/६०३, दि.१६/४/२००४ अन्वये उक्त दोघांविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ८ व १२ अन्वये खाते चौकशी प्रस्तावित करण्यात आली. प्रकरणात श्री.कमलाकर फड, तत्कालीन कर निर्धारक व संकलक यांची चौकशी अधिकारी तर श्री.वसंत निकम, उप अभियंता (पाणी पुरवठा-२ विभाग) यांची सादरकर्ता अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

चौकशी अधिकारी यांनी उक्त प्रकरणात चौकशी करून पत्र क्र. मनपा/कनिवसं/चौअ/२०२/२००४, दि.१८/१२/२००४ नुसार चौकशी अहवाल सादर केला होता. चौकशी अहवालात श्री.संजय करपे व श्री.नायबराव जंजाळ हे जबाबदार असल्याचे नमुद केले आहे. त्यांनी आपल्या कर्तव्यात सचोटी व कर्तव्य परायणता राखली नाही, असा निष्कर्ष नोंदविला आहे.

चौकशी अधिकारी यांनी दिलेल्या चौकशी अहवालात अपचारी कर्मचारी दोषी असल्याचे नमूद केले असून, रू.१३,७४,२७३/- रक्कमेचा संयुक्तपणे अपहार केला व पावती पुस्त क्र.६५५, ६६८, २१८ गहाळ केले. या संदर्भात चौकशी अधिकारी यांनी दिलेल्या अहवालावर विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेण्यात आला असता, संबंधीत अपचारी कर्मचाऱ्यांविरूध्द कठोर शिक्षा करणेबाबत मत/अभिप्राय नोंदविले आहे.

या गंभीर स्वरूपाच्या अनियमितते बाबत महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे कलम ५(९) अन्वये आपणांस सेवेतून बडतर्फ का करण्यात येवू नये, याबाबत कारणे दाखवा नोटीस देवून ०७ दिवसाचे आत खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आले. श्री.संजय करपे, ह्यांनी दि.५/९/२००७ रोजी व श्री.नायबराव जंजाळ ह्यांनी दि.२४/९/२००७ रोजी खुलासा सादर केला.

तत्पुर्वी श्री.नायबराव जंजाळ यांनी दि.४/९/२००७ रोजी नोटीसीचे उत्तर देण्यास २० दिवसांचा कालावधी मागीतला. सदर खुलाशात संबंधीतांनी अपहारित रक्कम भरण्याबाबत व ०३ पावती पुस्तक गहाळ केल्याबाबत काहीही म्हटलेले नाही. त्यामुळे त्यांचा खुलासा समाधानकारक नाही.

अपहारित रक्कम रू.१३,७४,२७३/- पैकी रू.१२,४००/- वसूल झाले असून उर्वरित अपहारित रक्कम रू.१३,६१,८७३/- ही असून संयुक्तपणे किती रक्कमेचा अपहार केला, याबाबत चौकशी अधिकारी यांनी सुध्दा चौकशी अहवालात मत नोंदविले नाही. त्यामुळे याबाबतची मुळ अभिलेखे मा.न्यायालयात जमा आहेत. त्यानुषंगाने मा.न्यायालयास विनंती करून सदर अभिलेख्यांची छायांकीत प्रती काढून अपहारित रक्कम काढता येईल.

करीता रू.१३,७४,२७३/- या रक्कमेचा झालेला अपहार, पावती पुस्त क्र. ६५५, ६६८, २१६ हे लेखा परिक्षणास उपलब्ध न करून देणे, कार्यालयीन दस्तऐवजामध्ये खाडाखोड करणे, कार्यालयीन अभिलेखे गहाळ करणे तसेच सदर अपहारामुळे मनपास आर्थिक भुर्दंड झालेला आहे. अशा गंभीर स्वरूपाच्या चुका संबंधीतांनी आपल्या कर्तव्य काळात केलेल्या आहेत. सदर प्रकरणाबाबत महानगरपालिकेचे विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेतला असता, संबंधीत अपचारी कर्मचाऱ्यांविरूध्द कठोर शिक्षा करणेबाबत अभिप्राय नोंदविला आहे. ही बाब लक्षात घेता, श्री.संजय किसनराव करपे व श्री.नायबराव भिवसन जंजाळ (कनिष्ठ लिपिक) तत्कालीन रोखपाल (निलंबीत) यांनी आपल्या कर्तव्य काळात कर्तवय परायणता व सचोटी राखलेली नसल्याने, संबंधितांनी महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ चे कलम ३ चा भंग केला आहे. त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे नियम ५६(१) अन्वये सक्षम प्राधिकाऱ्यांची खात्री झाल्यामुळे, याच अधिनियमातील ५६(१)(अ) अन्वये मा.स्थायी समितीचे अधिकार कक्षेत येत असल्याने, आता अपचारी कर्मचारी श्री.संजय किसनराव करपे व श्री.नायबराव भिवसन जंजाळ, (कनिष्ठ लिपीक) तत्कालीन रोखपाल (निलंबीत) यांचेविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे कलम ५ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ह) अन्वये महनगरपालिका सेवेतून बडतर्फ करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| मा.सभापती | : सहाय्यक आयुक्त-१ यांनी सविस्तर खुलासा करण्यात यावा. |
| सहा.आयुक्त-१ | : विषय क्र. ८६ संदर्भात सन २००३ मध्ये विभाग क्र.७ मध्ये रूपये १३,७४,२७५ चा आर्थिक गैरव्यवहार झालेला आहे. याची खाते चौकशी करण्यात आली त्यात दोन कर्मचारी दोषी असल्याचे तत्कालीन चौकशी अधिकारी यांनी निर्वाळा दिला. त्यानुसार संजय करपे व |

नायबराव जंजाळ हे दोघे जण दोषी असल्याचे आढळलेले आहे. त्यानुसार बडतर्फीचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

श्री.अ.रशिद खान(मामू) : किती दिवसापुर्वीचा आहे. दोषी कधी ठरविण्यात आले?

सहा.आयुक्त-१ : २००४ चे लेखापरिक्षण झाले तेव्हा हा खुलासा झाला त्यावेळेस गुन्हा दाखल करण्यात आला.

श्री.अ.रशीद खान मामू : चार वर्षे फाईल कोठे होती?

श्री.संजय जोशी : गुप्ता साहेब आयुक्त असतांना एक रिमार्क लिहिलेला आहे. यांना तात्काळ निलंबीत करावे त्याचा सविस्तर अहवाल स्थायी समितीसमोर ठेवावा.

सहा.आयुक्त-१ : २००५ ला चौकशी नंतर बडतर्फे करावे म्हणून मान्यता झाली आहे.

श्री.संजय जोशी : सदरचा प्रस्ताव एवढा उशीरा येणाचे कारण काय आहे.

मा.सभापती :२२.०९.२००५ रोजी आयुक्तांनी रिमार्क दिला की स्थायी समितीसमोर प्रस्ताव ठेवून बडतर्फ करण्यात यावे व त्यानंतरही लाल पेनने बरेच लिहिलेले आहे.

श्री.संजय जाशी : २२.०९.२००५ रोजी मा. आयुक्तांनी रिमार्क करतात परंतु प्रशासनातील इतर अधिकाऱ्यांनी स्थायी समितीसमोर आणत नाही. याला जबाबदार कोण आहे. सहा.आयुक्तानी एवढे दिवस संचिका स्वतःकडे का ठेवली. जे कोणी सहा.आयुक्त असतील त्यांना मी विचारत आहे की, मा.आयुक्तांचे न ऐकता संचिका का दाबून ठेवण्यात आली. याचा सविस्तर खुलासा प्रशासनाने द्यावा.

श्री.सतीश कटकटे : विधी विभाग व श्री.फड साहेब यांचा काय अहवाल आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जे पैसे अपहार केलेला आहे असे सिध्द झालेले असेल तर बडतर्फ केल्यानंतर पैसे वसुल होत असतील तर बडतर्फ करण्यात यावे. ज्या अधिकाऱ्यांनी मा.आयुक्तांचे आदेश पाळण्याचे टाळलेले आहे असे सर्व अधिकारी दोषी आहे. त्यांच्याकडून वसूल करण्यात यावे.

श्री.संजय जोशी : अधिकाऱ्यांच्या पगारातून वसूल करण्यात यावे. सदरचा ठराव का ठेवण्यात आलेला नाही याचे उत्तर प्रशासनाने द्यावे.

मा.सभापती : दि.२२.०९.२००५ ला मा.आयुक्तांनी लिहीलेले असतांना संचिका आस्थापना विभागात का दाबून ठेवण्यात आली त्यावर निर्णय का घेण्यात आला नाही याचा खुलासा करण्यात यावा. सदर प्रकरणात कोणकोण जबाबदार आहे याची माहिती द्यावी.

सहा.आयुक्त-१ : सहा.आयुक्त-१ म्हणून चार्ज घेतल्यानंतर माझ्याकडे संचिका आली व लगेचच प्रस्ताव ठेवलेला आहे.

मा.सभापती : चार्ज केव्हा घेण्यात आला.

सहा.आयुक्त-१ : जून मधे चार्ज घेतला.

श्री.संजय जोशी : आपणांस वैयक्तिक न विचारता सहा.आयुक्त-१ म्हणून विचारत आहे की, सदचा प्रस्ताव एवढे दिवस का ठेवण्यात आला नाही. यापूर्वी कोण होत.

मा. सभापती : प्रशासनाने दिलेले पत्र स.सदस्यांना दिले. श्री.टि.जी.जाधव, रविंद्र निकम, श्री.बी.ए.वाहूळ, श्री.अय्युब खान हे सहा.आयुक्त-१ म्हणून होते.

मा.सभापती : ह्या अधिकाऱ्यांचा कार्यकाळ काय आहे.

श्री.वसंत नरवडे : ह्या अधिकाऱ्यांवर निष्क्रियतेबाबतचा काय निर्णय घेवू शकतो काय, व निलंबीत असलेल्या कर्मचाऱ्यांना किती टक्के पगार दिला आहे.

मा.सभापती : निलंबीत कर्मचाऱ्यांना ५० टक्के कि ७५ टक्के पगार दिला याबाबत खुलासा करावा.

सहा.आयुक्त-१ : ५० टक्के दराने पगार देण्यात आलेला आहे.

श्री.संजय जोशी : २००५ पासून ५० टक्के पगार दिलेला आहे.

सहा.आयुक्त-१ : निलंबीत केलेल्या तारखेपासून.

श्री.संजय जोशी : २००५ पासून आज पर्यंत ५० टक्के पगार निलंबीत कर्मऱ्यांना मिळावा हिच प्रशासनाची/अधिकाऱ्यांची इच्छा होती. त्याकारणाने हा ठराव ठेवण्यात आला नाही. दोषी कर्मचाऱ्यांना आज बडतर्फ करा परंतु ५० टक्के पगार संबधीत अधिकाऱ्यांकडून वसूल करण्यात यावा. जे कोणी अधिकारी जबाबदार असेल त्यांच्याकडून वसूल करण्यात यावा. वेळीच प्रस्ताव आला असता तर महानगरपालिकेचे एवढे आर्थीक नुकसान झाले नसते.

श्री.नरवडे पाटील : त्यावेळी जे होते त्यांचेकडून वसूल करावा.

सहा.आयुक्त-१ : श्री.टि.जी.जाधव यांच्या कार्यकाळात सदर संचिकेची सुरवात झाली आहे. परंतु २००५ला मा.आयुक्तांचे आदेश झाले तेव्हा श्री.जाधव यांची बदली झाली होती. त्यामुळे त्यांचा या प्रकरणाशी संबध नाही. मा.आयुक्तांचे आदेश झाले तेव्हा श्री.रविंद्र निकम यांचेकडे चार्ज होता. त्यानंतर सदरची संचिका पेंडीग राहिली. मध्यंतरी माझा ११ महिण्याचा कार्यकाळ होता. त्या काळात आस्थापनाकडे, माझ्याकडे संचिका आली नाही. त्यानंतर एक वर्षाच्या काळात श्री.बी.ए.वाहूळ यांचेकडे चार्ज होता. त्याच्याकडे संचिका आली त्यांनी ती पुन्हा मा.आयुक्त यांचेकडे पाठवली. मा.आयुक्तांनी संचिकेमधे लिहिले की, एवढे दिवस प्रलंबीत ठेवण्याचे कारण काय? दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करा आणि कर्मचाऱ्यांना तात्काळ बडतर्फ करा म्हणून आदेश झालेले आहे. मा.आयुक्तांनी दोनदा बडतर्फीचे आदेश दिलेले आहे.

श्री.वसंत नरवडे : सदरील प्रकरणाला पुन्हा एक वर्ष गेल्यानंतर अपहारित रक्कम रू.१३,७४,२७३/- बाबत कुणीही निर्णय घेतलेला नाही. अपहारित रक्कम कुणाकडून वसूल करणार.

सहा.आयुक्त-१ : दोषी कर्मचाऱ्यांचे ग्रॅच्यईटी, प्रॉव्हीडंट फंड, जी.पी.एफ.ची रक्कम आहे त्याच्यातून वसूल होईल. तिन महिण्यानंतर ७५ टक्के पगार अदा करावयास पाहिजे होता तो ५० टक्के दरानेच दिला गेला. पाच वर्षाची रक्कम ५० टक्केप्रमाणेच दिली गेली.

श्री.वसंत नरवडे :आतापर्यंत गेलेल्या रक्कमेच्या वसूली होवू शकते का? आतापर्यंत किती रक्कम प्राप्त झाली. २५% रक्कमेतून वसूल होईल का?

सहा.आयुक्त-१ : ह्यापैकी काहीच प्राप्त झालेले नाही.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : असेच सहकार क्षेत्रात होते. ५० लाख घ्यायचे असेल तर ५० लाख वाढवून द्यावे. २५% रक्कम किती, ग्रॅच्युईटी किती, दुसरे किती. नुकसानीसाठी जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांचेकडून घ्यावे. पैसे कसे वसुल होतील ते पहावे.

मा.सभापती : दोन अधिकाऱ्यांपैकी कुठला अधिकारी सेवानिवृत्त होत आहे काय? सेवानिवृत्त होत असेल तर ४ लाखाची रक्कम वसुल होईल की नाही. याची काय दक्षता घेता येईल याचा खुलासा व्हावा.

श्री.अ.रशीद खान मामू : तोपर्यन्त पेन्शन मंजूर होत नाही.

सहा.आयुक्त-१ : लेखा विभागाकडून अहवाल घ्यावा लागेल त्यांची ग्रॅच्युअटी, प्रॉव्हीडंड फंड, जी.पी.एफ ईत्यादी बाबतीत.

श्री.रविकांत गवळी : २००३ मध्ये जो अपहार झालेला आहे त्यामधे तिन लोकांचा समावेश होता.त्यातील एक जण निलंबीत होता त्यामुळे दोघांवर कारवाई झाली. व १२५०० रूपये वसूल करण्यात आले. २००४ मधे आपण १४ लाखाची अपहारित रक्कम अदयापपर्यंत वसुल केलेली नाही.

मा.सभापती : स.सदस्य रशिद मामू यांचे असे म्हणणे आहे की, त्यातील एक सहा.आयुक्त सेवानिवृत्त होत आहे. त्यांना पेंशन देण्यात येवू नये, त्यांच्या पगारातून रक्कम वसूल करण्यात यावी.

श्री.अ.रशिद खान(मामू) : संचिका दाबण्यामागे क्लार्कचाही हात असू शकतो.

श्री.वसंत नरवडे : ५० टक्क्यावरती दोषी कर्मचाऱ्यांनी आपले घर चालवले आणि ५० टक्के रक्कम महानगरपालिकेची रक्कम महानगरपालिकेला घ्यावयाची आहे. शिस्त व अपिल हा नियम लागू करावा. ४ वर्षे चौकशी होणार का. नंतर रिपोर्ट करणार का. हा निर्णय ताबडतोब घेतला असता तर पैसे वाया गेले नसते.

श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर : आदेशाचे पालन न करणे, हलगर्जीपणा करणे याबाबत कार्यवाही करावी.

श्री.वसंत नरवडे पा. : उपआयुक्त (म) यांना या प्रकरणी सर्वस्वी जबाबदार धरण्यात यावे. यांचे नियंत्रण न ठेवण्यासाठी त्यावर कार्यवाही करावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : श्री.वाहुळ दोषी आहे किंवा नाही हे पहिले जाणू न घ्या.

श्री.वसंत नरवडे : श्री.वाहुळ यांनी संचिका मुव्ह केली ती आयुक्तांपर्यंत गेली आयुक्तांनी त्याच्यावर शेरा मारला. वैयक्तिकरित्या कुणालाही जबाबदार धरण्यात येवू नये जे दोषी असेल त्यांनाच जबाबदार धरण्यात यावे.

श्री.संजय जोशी : सविस्तर अहवाल येवू द्या, निलंबनाची कारवाई किती तारखेला झाली त्यावेळी सहा.आयुक्त कोण होते, मा.आयुक्तांचे आदेश झाल्यानंतर सहा.आयुक्त कोण होते, पहिल्या वेळेस मा.आयुक्तांनी संचिकेवर रिमार्क केले तेव्हा कोण होते दुसऱ्यांदा रिमार्क केले तेव्हा

कोण होते. अशी सविस्तर टिप्पणी तयार करून स्थायी समितीच्या सदस्यांना द्या. मग ठरवण्यात येईल की कोण दोषी आहे, प्रशासनाने ठरवावे कोण दोषी आहे.

| | |
|---|---|
| श्री.वसंत नरवडे | :दोषी कर्मचाऱ्यांविरूध्द आज निर्णय घ्यावा. |
| श्री.सतीश कटकटे | : रू.१३,७४,८७३/- पेक्षा जास्त अपहार झाला असावा. |
| मा.सभापती | : संजय किसनराव करपे आणि जंजाळ यांनी रक्कम रूपये १३ लाख ७४ हजार चा अपहार केला आहे असे सकृतदर्शनी दिसत आहे. जे तिन बुक आहे ते अद्याप पर्यंत सापडलेले नाही. दोन कर्मचाऱ्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. रूपये १३,७४,८७३/- चा भ्रष्टाचार केल्याचे सिध्द झाले आहे. यापैकी १२५००/- रूपये वसूल करण्यात आलेले आहे. महानगरपालिकेचे तत्कालीन मा.आयुक्त श्री.गुप्ता यांनी २२.०९.२००५ रोजी संबधीत कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीसमोर ठेवण्याचे संचिकेमध्ये लिहिलेले होते, परंतु आस्थापना विभागातील दोन सहाय्यक्त आयुक्त श्री.रविंद्र निकम व श्री.बी.ए.वाहूळ यांनी या प्रकरणी लक्ष घातलेले नाही. हे स्पष्टपणे संचिकेची पाहणी केल्यावर दिसत आहे. सदरची संचिका प्रलंबीत राहील्यामुळे निलंबीत कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले ४,०७,३०६/- रूपये ही रक्कम श्री.रविंद्र निकम व श्री.बी.ए.वाहूळ यांच्या पगारातून तात्काळ वसूल करण्यात यावे. यांच्याविरूध्द खाते चौकशी करण्यात यावी. खाते चौकशीचा अहवाल येईपर्यंत जर यापैकी कोणी अधिकारी सेवानिवृत्त होत असलेले असतील तर त्यांना या प्रकरणाची पुर्ण चौकशी झाल्या शिवाय सेवानिवृत्तीच्या कुठलाही लाभ देवू नये आणि जे तिन बुक गहाळ झालेले आहे ते जोपर्यंत मिळत नाही तोपर्यंत किती भ्रष्टाचार झालेला आहे हे सिध्द होत नाही. तो पर्यंत जे अधिकारी सेवानवृत्त होत आहे त्यांना कुठल्याही प्रकारच्या ग्रच्युईटी, पेंन्शनचे लाभ देण्यात येवू नये. विषय क्र ८६ मध्ये सर्वानुमते निर्णय देत आहे. |
| श्री.सतीश कटकटे | : ५०% त्यांचे पगारातून कपात करता येते का. |
| श्री.रविकांत गवळी | : ११ महिन्यासाठी श्री.अय्युबखान होते. |
| मा. सभापती | : दोन कर्मचाऱ्यांना तात्काळ बडतर्फ करण्यात यावे. चौकशी करावी आणखी किती अपहार झाला. तसेच जे तिन बुक गहाळ झालेले आहे ते जोपर्यंत मिळत नाही, किती भ्रष्टाचार झालेला आहे हे तोपर्यंत सिध्द होत नाही. दोषी अधिकाऱ्यांविरूध्द कारवाई करावी व स्थायी समितीसमोर अहवाल सादर करण्यात यावा. |
| श्री.वसंत नरवडे | :आपण जो एक शब्द वापरला यातील एक अधिकारी सेवानिवृत्त होतोय. कुणाच्या सेवानिवृत्तीमधे त्रास द्यायचा नाही, असं करू नका. त्यांना जबाबदारीने विचारा. |
| मा. सभापती | : फाईल सापडत नाही. ३ पुस्तके येतील. त्यामुळे कार्यवाही करावी लागेल. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :पेन्शन घेण हा त्यांचा हक्क आहे. |
| श्री.वसंत नरवडे पा. | : अधिकारी किंवा लिपिकाच्या चुकीमुळे राहिले असेल तर. त्यांच्या येणाऱ्या पेन्शनवर नुकसान करू नका. |
| श्री.सतिष कटकटे | : जोपर्यंत चौकशीचा निर्णय होत नाही तोपर्यंत निर्णय घेण्यात येवू नये. |
| मा.सभापती | : या प्रकरणाची पुन्हा चौकशी करण्यात येऊन जे ३ बुक गहाळ झालेले आहे त्या प्रकरणी मुख्य लेखापरिक्षक यांनी पुन्हा चौकशी करावी. श्री.जरारे, वॉर्ड अधिकारी यांनी मदत करावी आणि प्रकरणाची सविस्तर माहिती ०१ महिन्याचे आंत स्थायी समितीकडे मुख्य लेखा परीक्षक यांनी द्यावी. |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अपचारी कर्मचारी श्री.संजय किसनराव करपे व श्री.नायबराव भिवसन जंजाळ, (कनिष्ठ लिपीक) तत्कालीन रोखपाल (निलंबीत) मनपा औरंगाबाद ह्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे कलम ५ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ह) अन्वये महनगरपालिका सेवेतून बडतर्फ करण्यास मंजुरी देण्यात येते.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, सदरची संचिका प्रलंबीत राहील्यामुळे निलंबीत कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले ४,०७,३०६/- रूपये ही रक्कम श्री.रविंद्र निकम (तत्कालीन सहाय्यक आयुक्त-१) व श्री.बी.ए.वाहूळ(तत्कालीन सहाय्यक आयुक्त-१) यांच्याकडून, त्यांची खातेनिहाय चौकशी करून वसूल करण्याची कार्यवाही करावी. जे ३ बुक गहाळ झालेले आहे त्याची देखील मुख्य लेखापरिक्षक यांनी पुन्हा चौकशी करावी. श्री.जरारे, वॉर्ड अधिकारी यांनी मदत करावी आणि प्रकरणाची सविस्तर अहवाल ०१ (एक) महिन्याचे आंत स्थायी समितीकडे मुख्य लेखा परीक्षक यांनी सादर करावा.

या कालावधीत कुणी सेवानिवृत्त होत असल्यास सेवानिवृत्तीचे लाभ देय होणार नाहीत. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

मा. सभापती : सदरची सभा सोमवार (दि.२२/९/२००८) पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

तहकूब सभा दि.२२/९/२००८ रोजी आयोजित करण्यात येणार असल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद**

**स्थायी समिती सभा**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (१३)**

**दिनांक :- १९/०९/२००८**

**सू च ना**

दिनांक १९/९/२००८ रोजी तहकुब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा आता **सोमवार दिनांक २२/९/२००८ सकाळी ११.०० वाजता** 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे आयोजित करण्यात येत आहे. सभेची विषयपत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्र.१३) यापुर्वीच वक्तशीर वितरीत करण्यात आलेली आहे.

**सभा वेळेवर सुरू होईल. कृपया याची नोंद घ्यावी** व सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद